e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

**7.1.4: Describe the Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socioeconomic and Sensitization of students and employees to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens**

**Response:**

Kindly refer the list of programs conducted in academic year 2019-20.

| Sr. No. | Name of the activity | Date of organization | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Guru Purnima Celebration | 16/07/2019 | 3-6 |
| 02 | Cleanliness Fortnight | 01/08/2019 to 15/08/2019 | 7-10 |
| 03 | International Day of the World's Indigenous Peoples | 10/08/2019 | 11-14 |
| 04 | Addiction Relief Campaign | 21/08/2019 | 15-16 |
| 05 | Workshop on Jatiya Salokha | 22/08/2019 | 17-23 |
| 06 | Beti Bachhav Beti Padhav Abhiyan | 03/09/2019 | 24-27 |
| 07 | Constitution Day | 26/11/2019 | 28-30 |

PES Karmvee A.M.Patil Arts, Commerce & Kai. Annasaheb N.K.Patil Sci. Sr. College Pimpalner Tal. Sakri Dhule.

Pimpalner Education Society's

KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND

KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,

PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010

Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

Continue…



| Sr. No. | Name of the activity | Date of organization | Page No. |
|---|---|---|---|
| 08 | A Study Under Cillege Area Development Project | 07/12/2019 | 31-42 |
| 09 | Karate Training Camp for Girl Student | 24/01/2020 to 31/01/2020 | 43-50 |
| 10 | Workshop on Gender Equality | 11/02/2020 | 51-52 |
| 11 | COVID Lockdown Duty | From March 2020 | 53-54 |
| 12 | Yoga Day Celebration (Online) | 21/06/2020 | -- |



PES Karmvee A. M. Patil Arts, Commerce & Kai. Annasaheb N. K. Patil Sci. Sr. College Pimpalner Tal. Sakri Dhule

Pimpalner Education Society's

**KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE, PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.**

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

## 1. Guru Purnima Celebration: 16/07/2019






## Guru Purnima Celebration: 16/07/2019









**Guru Purnima Celebration: 16/07/2019**









**Guru Purnima Celebration: 16/07/2019**

# पिंपळनेर महाविद्यालयात गुरु पौर्णिमा साजरी

**पिंपळनेर(प्रतिनिधी)** - पिंपळनेर येथील कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालयात गुरु पौर्णिमा साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ. डब्ल्यू.बी. शिरसाठ हे होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. सोनवणे म्हणाले की, वर्गातील पुस्तकी ज्ञान तुम्हांला पोट भरण्यासाठी उपयोगी ठरते तर वर्गाबाहेरील गुरूंनी दिलेले ज्ञान हे कसे जगावे हे शिकविते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा प्रस्फोट होत आहे. कुठलीही माहीती एका क्षणात गुगलवर मिळते. भविष्यात कदाचित स्टुडंट विना क्लास रुम असतील अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.

प्रा.डॉ. डब्ल्यू.बी. शिरसाठ यांनी आपल्या मनोगतातून गुरुंचे महत्त्व विषद करतांना सांगीतले की, गुरु हे आपले खरे मार्गदर्शक असतात, आपल्या जीवनाला आकार देण्याचे काम ते करतात. त्यांच्यामुळे आपल्यात आत्मविश्वास, संयम, सचोटी, नम्रता या गुणांचा विकास होतो. म्हणून विद्याविनयेन शोभते असेही ते म्हणाले. याप्रसंगी कु. वैभवी शिंपी, कु. योगेश्वरी सुर्यवंशी, कु. नेहा वाघ, रविराज एखंडे व कु. मुश्कान शेख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रा.एम.बी.एखंडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.के. डी. कदम, प्रा.डॉ. राम पेटारे, प्रा.डॉ. संजय खोडके हे प्रयत्नशील होते.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

# 2. Cleanliness Fortnight: 1 to 15 Aug. 2019

| A Brief Report of event | |
|---|---|
| Scheme: Swachh Bharat Abhiyan Pandharwada | |
| Titile: **Cleanliness Fortnight** | |
| Date | 1 August to 15 August 2019 |
| Inauguration | 1 August 2019 by Hon. Prin. Dr. S. T. Sonawane |
| | 2. Speech of Principal Dr. S. T. Sonawane |
| | 3. Speech of Students |
| Visits | Students visited in slum area giving message of cleanliness |
| Objective of program | **1. To accelerate the efforts to achieve universal sanitation coverage and to** put the focus on sanitation.<br>2. The campaign aims **to achieve the vision of a 'Clean India**'. |
| Organized by | NSS Unit |

Karmvee A. M. Patil Arts, Commerce & Kai. Annasaheb N. K. Patil Sci. Sr. College, Pimpalner, Tal. Sakri, Dhule

## Cleanliness Fortnight: 1 to 15 Aug. 2019






**Cleanliness Fortnight: 1 to 15 Aug. 2019**

लोकमत

# पिंपळनेर महाविद्यालयातर्फे स्वच्छ भारत अभियान पंधरवडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपळनेर** : येथील कर्म.आ.मा. पाटील व कै.अण्णासो एन.के. पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा' राबविण्यात येणार आहे.

या अभियानाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. टिळक यांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंतीचे औचित्य साधत या उपक्रमाची सुरुवात झाली. सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आलेले अण्णाभाऊ साठे यांनी परदेशात जाऊन महाराष्ट्राचा ठसा उमटविला, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सोनवणे यांनी उद्घाटन प्रसंगी केले. प्रमुख अतिथी प्रा.पी.एम. सावळे यांनी आपल्या मनोगतातून स्वच्छता ही काळाची गरज आहे, स्वच्छतेचे महत्त्व त्यांनी अनेक उदाहरणातून पटवून दिले. महाविद्यालयाची विद्यार्थिनी चौरे हिने आपले मनोगत व्यक्त केले. या पंधरवाड्यात विविध विभागात रासेयोचे विद्यार्थी जाऊन परिसराची स्वच्छता करणार आहेत. त्याचप्रमाणे परिसरात स्वच्छतेविषयी जनजागृती करणार असून नागरिकांना स्वच्छतेचे आवाहन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आनंद खरात यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.के. काकड प्रयत्नशील होते. कार्यक्रमास प्रा.के.आर. राऊत, प्रा.एस.एन. तोरवणे, प्रा.नेरकर, प्रा.वेंदे व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Dhule
Page No. 2 Aug 03, 2019
Powered by: erelego.com

**Cleanliness Fortnight: 1 to 15 Aug. 2019**

सकाळ

# स्वच्छता अभियानचे पिंपळनेरला उद्‌घाटन

सकाळ वृत्तसेवा

पिंपळनेर, ता. २ : येथील कर्मवीर आ. मा. पाटील व एन. के. पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'स्वच्छ भारत अभियान पंधरवडा' राबविण्यात येत आहे.

प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंतीनिमित्त हा उपक्रम राबविण्यात येत आहे. प्राचार्य डॉ.सोनवणे, प्रा. पी. एम. सावळे यांनी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आनंद खरात यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. एस. के. काकड प्रयत्नशील होते. कार्यक्रमास प्रा. के. आर. राऊत, प्रा. एस. एन. तोरवणे, प्रा. नेरकर, प्रा. वेंदे आदी उपस्थित होते.

Jalgaon, Dhule-Today

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

# 3. International Day of the World's Indigenous Peoples:10/08/2019

कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागाच्या अंतर्गत **जागतिक आदिवासी दिन व क्रांतीदिन** साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे तर प्रमुख वक्ते प्रा. पी. एम. सावळे व प्रा. के. एन. वसावे हे उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. सोनवणे म्हणाले की, आदिवासी हे मूल निवासी आहेत. ते सदैव निसर्गाच्या सानिध्यात राहिल्याने ते खऱ्या अर्थाने निसर्गोपासक आहेत. आदिवासींचा झाकोळला गेलेला गौरवशाली इतिहास जागतिक आदिवासी दिनानिमित्त बाहेर यायला हवा व आधुनिकीकरणाच्या मुख्य प्रवाहात हा समाज आल्याशिवाय या देशाची प्रगती होणार नाही असे प्रतिपादन त्यांनी केले.

प्रा. पी. एम. सावळे यांनी आपल्या भाषणातून आदिवासींचा प्राचीन इतिहास सांगीतला. आदिवासी समाजातील समाजसुधारक, स्वातंत्र्यसेनानी यांचा उल्लेख करतांना भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान यावरही प्रकाश टाकला. आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणारे जगातील तमाम आदिवासी बांधव हेच खरे शाश्वततेचे पाईक आहेत असेही ते म्हणाले. प्रा. के. एन. वसावे यांनी या प्रसंगी आदिवासींच्या समस्या व त्यावरील उपाय या विषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. सी. एन. घरटे यांनी केले तर आभार प्रा. एस. एन. तोरवणे यांनी मानलेत. कार्यक्रम यशश्वीतेसाठी प्रा. डॉ. संजय खोडके हे प्रयत्नशील होते. याप्रसंगी प्रा. डॉ. राम पेटारे, प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ, प्रा. के.डी. कदम, प्रा. के. आर. राऊत, प्रा. एस. के. काकड, प्रा. डॉ. ए. जी. खरात हे उपस्थित होते.

दि. १०/०८/१९ रोजी जागतिक आदिवासी दिन साजरा











# International Day of the World's Indigenous Peoples:10/08/2019



## पिंपळनेर महाविद्यालयात आदिवासी दिन

येथील कर्मवीर आ.मा. पाटील कला, वाणिज्य व अण्णासोा. एन.के.पाटील विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागाच्या अंतर्गत जागतिक आदिवासी दिन व क्रांतीदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे तर प्रमुख वक्ते प्रा.पी.एम. सावळे व प्रा.के.एन. वसावे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.सी.एन. घरटे यांनी केले तर आभार प्रा.एस.एन. तोरवणे यांनी मानले. यशश्वीतेसाठी प्रा.डॉ. संजय खोडके प्रयत्नशील होते. याप्रसंगी प्रा.डॉ. राम पेटारे, प्रा.डॉ. डब्ल्यू. बी.शिरसाठ, प्रा.के.डी. कदम, प्रा. के.आर. राऊत, प्रा. एस. के. काकड, प्रा.डॉ.ए.जी. खरात हे उपस्थित होते..

Pimpalner Education Society's

KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND

KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,

PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010

Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

# 4. Addiction Relief Campaign : 21 Aug. 2019

| A Brief Report of event | |
|---|---|
| Scheme: **Addiction Relief Campaign** | |
| Titile: **Addiction Relief Rally** | |
| Date | 21 August 2019 |
| Inauguration | 1. 21 August 2019 by Hon. Prin. Dr. S. T. Sonawane |
| | 2. Speech of Principal Dr. S. T. Sonawane |
| Rally | Rally through Sanjay Nagar, Indira Nagar, Ram Nagar, Near College, Campus, Slum Area giving message of hazards of addiction. |
| Objective of program | 1. Awareness generation programmes<br>2. .To reach out to the masses and spread awareness about hazards of addiction. |
| Organized by | NSS Unit |

**Addiction Relief Campaign**
**: 21 Aug. 2019**






e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

## 5. Workshop on Jatiya Salokha: 22/08/2019

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने **जातीय सलोखा कार्यशाळा** आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळा दि. २२ ऑगस्ट २०१९ वार गुरुवार रोजी संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष श्री. सुरेंद्र मराठे, जिल्हा विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. हसीम शेख, हिंदू धर्माचे प्रतिनिधी प. पु. योगेश्वर महाराज देशपांडे, ख्रिश्चन धर्माचे प्रतिनिधी श्री. शिवाजी राऊत, बौद्ध धर्माचे प्रतिनिधी श्री. भटू पवार, मुस्लीम धर्माचे प्रतिनिधी श्री. पप्पू कुरैशी, जैन धर्माचे प्रतिनिधी श्री. अशोक जैन, शीख धर्माचे प्रतिनिधी म्हणून मानव केंद्राचे श्री. आर. व्ही. पाटील उपस्थित होते.

या कार्यशाळेची सुरुवात दिप प्रज्वलनानंतर सर्वधर्म प्रार्थनेने करण्यात आली. विविध धर्माचे प्रतिनिधी यांनी आपआपल्या धर्माची माहीती, शिकवण उपस्थिती विद्यार्थांना, प्राध्यापकांना दिली. प्रत्येकाने आपआपल्या धर्माप्रमाणे आचरण करणे. कोणताही धर्म श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. खऱ्या धर्माची व्याख्या म्हणजे इतरांना संकटकाळी मदत करणे. प्रत्येक धर्म सदाचार, मानवता, सहिष्णुता या मुल्यांचीच शिकवण देतो असे विचार धर्म प्रतिनिधींनी मांडलेत. इन्सान को इन्सान के करीब लानेवाला ही सच्चा धर्म है किंबहुना धर्म जोडता है तोडता नही असेही त्यांनी सांगीतले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. डॉ. राम पेटारे यांनी तर आभार प्रा. पी. एम. सावळे यांनी मानलेत. कार्यक्रम यशस्वीते साठी प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ, प्रा. के. डी. कदम, प्रा. सी. एन. घरटे, प्रा. एस. के. काकड, प्रा. व्ही. जी. उगलमुगले आदी प्रयत्नशील होते. या कार्यशाळेत महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे विद्यार्थी सहभागी झालेत. राष्ट्रगीताने कार्यशाळेची सांगता झाली.

# Workshop on Jatiya Salokha: 22/08/2019









# Workshop on Jatiya Salokha: 22/08/2019








# Workshop on Jatiya Salokha: 22/08/2019









# Workshop on Jatiya Salokha: 22/08/2019









# Workshop on Jatiya Salokha: 22/08/2019

## दै. देशदूत दि. २४ ऑगस्ट २०१९

# जातीय सलोखा असेल तरच राष्ट्राची उन्नती

**प.पु.योगेश्वर महाराज देशपांडे यांचे प्रतिपादन; आ.मा.पाटील महाविद्यालयात कार्यशाळा**



■ पिंपळनेर । दि.२३ । वार्ताहर

वसुधैव कुटुंबकम ही संकल्पना मानणारा आपला देश जगातील एकमेव देश आहे. जातीय सलोखा असेल तरच राष्ट्राची उन्नती होईल. आपण कोणत्या धर्माचे आहोत, हे महत्त्वाचे नसून प्रथम भारताचे नागरीक आहोत हे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन विठ्ठल मंदिर संस्थानचे मठाधिपती प.पु. योगेश्वर महाराज देशपांडे यांनी केले.

कर्म. आ. मा. पाटील महाविद्यालयात आयोजित जातीय सलोखा कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष सुरेंद्र मराठे, प्रा. हसीम शेख (जिल्हा विद्यार्थी विकास अधिकारी), प.पु. योगेश्वर महाराज देशपांडे, शिवाजी राऊत, भट्टू पवार, पप्पू कुरैशी, अशोक जैन, आर. व्ही. पाटील हे उपस्थित होते. कार्यशाळेची सुरूवात दिप प्रज्वलनानंतर सर्वधर्म प्रार्थनेने करण्यात आली. यावेळी सर्व प्रमुख अतिथी तसेच विविध धर्मांचे प्रतिनिधी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपआपल्या धर्माची माहीती, शिक्षण उपस्थित विद्यार्थांना, प्राध्यापकांना दिली.

प्रत्येकाने आपआपल्या धर्माप्रमाणे आचरण करणे. कोणताही धर्म श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. खऱ्या धर्माची व्याख्या म्हणजे इतरांना संकटकाळी मदत करणे. प्रत्येक धर्म सदाचार, मानवता, सहिष्णुता या मुल्यांचीच शिकवण देतो, असे विचार धर्म प्रतिनिधींनी मांडले. इन्सान को इन्सान के करीब लानेवाला ही सच्चा धर्म है, किंबहुना धर्म जोडता है तोडता नही, असेही त्यांनी सांगीतले. प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. संजय खोडके यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. डॉ. राम पेटारे यांनी केले. तर आभार प्रा. पी. एम. सावळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.डब्ल्यू. बी. शिरसाठ, प्रा.के.डी. कदम, प्रा.बी.एन. घरटे, प्रा.एस.के. काकड, प्रा.व्ही. जी. उगलमुगले आदी प्रयत्नशील होते.

## दै. स्वतंत्र भारत दि. २४ ऑगस्ट २०१९

# जातीय सलोखा असेल तरच राष्ट्राची उन्नती : प.पु.योगेश्वर महाराज



पिंपळनेर । जातीय सलोखा असेल तरच राष्ट्राची उन्नती होईल. आपण कोणत्या धर्माचे आहोत हे महत्त्वाचे नसून प्रथम भारताचे नागरिक आहोत हे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन विठ्ठल मंदिर संस्थानचे मठाधिपती प.पु.योगेश्वर महाराज देशपांडे यांनी केले. ते कर्मवीर आ.मा.पाटील महाविद्यालयात आयोजित जातीय सलोखा कार्यशाळेत बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी.सोनवणे तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष सुरेंद्र मराठे, प्रा.हसीम शेख, शिवाजी राऊत, भटू पवार, पप्पू कुरैशी, अशोक जैन, आर.व्ही. पाटील आदी उपस्थित होते. यावेळी सर्व प्रमुख अतिथी तसेच विविध धर्मांचे प्रतिनिधी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपआपल्या धर्माची माहिती, शिकवण उपस्थित विद्यार्थांना, प्राध्यापकांना दिली.

# Workshop on Jatiya Salokha: 22/08/2019

## दै. सकाळ दि. २४ ऑगस्ट २०१९

सकाळ



पिंपळनेर (ता. साक्री) : जातीय सलोखा कार्यशाळेत मार्गदर्शन करताना योगेश्वर महाराज देशपांडे, व्यासपीठावर भटू पवार, अशोक जैन, सुरेंद्र मराठे, शिवाजी राऊत, प्रा. हसीम शेख, प्राचार्य डॉ.एस. टी. सोनवणे, पप्पू कुरेशी. (छायाचित्र : अंबादास बेनुस्कर)

# जातीय सलोख्यातूनच होईल राष्ट्राची प्रगती

## योगेश्वर देशपांडे : पिंपळनेरला पाटील महाविद्यालयात कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

पिंपळनेर, ता. २३ : जातीय सलोखा असेल, तरच राष्ट्राची प्रगती होईल. कोणत्या धर्माचे आहोत, हे महत्त्वाचे नसून, प्रथम भारताचे नागरिक आहोत, हे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन विठ्ठल मंदिर संस्थानचे मठाधिपती योगेश्वर महाराज देशपांडे यांनी केले.

येथील कर्मवीर आ. मा. पाटील महाविद्यालयात झालेल्या जातीय सलोखा कार्यशाळेत बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे उपाध्यक्ष सुरेंद्र मराठे, प्रा. हसीम शेख, योगेश्वर महाराज देशपांडे, शिवाजी राऊत, भटू पवार, पप्पू कुरेशी, अशोक जैन, आर. व्ही. पाटील आदी उपस्थित होते. कार्यशाळेची सर्वधर्म प्रार्थनेने सुरवात झाली. विविध धर्मांच्या प्रतिनिधींनी मनोगत व्यक्त केले.

प्रत्येकाने आपापल्या धर्माप्रमाणे आचरण करणे, कोणताही धर्म श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही, खऱ्या धर्माची व्याख्या म्हणजे इतरांना संकटकाळी मदत करणे, प्रत्येक धर्म सदाचार, मानवता, सहिष्णुता या मूल्यांचीच शिकवण देतो, असे विचार प्रतिनिधींनी मांडले. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. राम पेटारे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पी. एम. सावळे यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाट, प्रा. के. डी. कदम, प्रा. सी. एन. घरटे, प्रा. एस. के. काकड, प्रा. व्ही. जी. उगलमुगले आदी प्रयत्नशील होते.

Jalgaon, Dhule-Main
24/08/2019 Page No. 2

Pimpalner Education Society's
KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND
KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,
PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

## 6. Beti Bachhav Beti Padhav Abhiyan : 3 Sept. 2019

**बेटी बचाव, बेटी पढाओ : प्रमुख मार्गदर्शक डॉ. सौ.मीना शिंदे**

स्त्री ही अबला नसून ती सबला आहे. तिने स्वतःला मी सक्षम आहे असे मनाला बजावले पाहिजे. असे प्रतिपादन डॉ. सौ. मीना शिंदे यांनी केले. त्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बेटी बचाव, बेटी पढाओ या अभियांना अंतर्गत कार्यक्रमात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे होते.

डॉ. मीना शिंदे उपस्थितांना मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाल्या की, स्त्रीयांनी आपल्यात असणारी नकारात्मकता संपवून टाका. स्त्री सबलीकरणासाठी शिक्षण आवश्यक आहे. आजच्या काळात आनंदाची बाब म्हणजे शिक्षणात मुलींचे प्रमाण जास्त असून त्या गुणवत्तेत मुलांपेक्षा पुढे आलेत. मुलांमध्ये तंबाखू, गुटखा खाण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे तंबाखू मुक्ती अभियान प्रभावी होणे गरजेचे आहे. तरूणांनी व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे म्हणाले की, काही वेळेस समाजात असे अनुभवास येते की, व्यसनाधीन व्यक्तीचा मुलगा व्यसनी होईलच असे नाही किंवा निर्व्यसनी व्यक्तीचा मुलगा निर्व्यसनीच असेल असेही नाही. हे त्यांनी अनेक उदाहरणांचा दाखला देत स्पष्ट केले. व्यक्तीमत्व विकासावर कौटुंबिक संस्कार, परिस्थिती, मित्र, शाळा - महाविद्यालय इ. बाबी जबाबदार असतात. तसेच त्यांनी समाजात स्त्री आणि पुरुष यांचे व्यस्त असलेल्या प्रमाण, तरुणांना विवाहासाठी मुली न मिळणे याबाबत चिंता व्यक्त केली.

सुत्रसंचलन प्रा. डॉ. राम पेटारे यांनी तर आभार प्रा. सी. एन. घरटे यांनी मानलेत. या कार्यक्रमास प्रा. के. डी. कदम, प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ, प्रा. डॉ. बी. सी. मोरे, प्रा. डॉ. वाय. एस. मोरे, प्रा. डॉ. पी. पी. तलवारे, प्रा. एस. के. काकड, प्रा. व्ही. जी. उगलमुगले, प्रा. डॉ. एन. बी. सोनवणे, प्रा. वाय. एम. नांद्रे, प्रा. एस. एन. तोरवणे व विज्ञान शाखेचे सर्व विद्यार्थी/ विद्यार्थीनी उपास्थित होते.

# Beti Bachhav Beti Padhav Abhiyan: : 3 Sept. 2019








# Beti Bachhav Beti Padhav Abhiyan: : 3 Sept. 2019





दै. स्वतंत्र भारत दि. १२ सप्टेंबर २०१९

# महिलांनी सक्षम होणे काळाची गरज

## बेटी बचाव- बेटी पढाओ कार्यशाळेत डॉ. शिंदेचे प्रतिपादन



**दहिवेल।** स्त्री ही अबला नसून ती सबला आहे. स्त्रीने स्वतःला मी सक्षम आहे असे मनाला बजावले पाहिजे; असे प्रतिपादन डॉ. मीना शिंदे यांनी बेटी बचाव-बेटी पढाओ या कार्यक्रमावेळी बोलतांना केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे, प्रमुख अतिथी जयश्री कदम उपस्थित होते. डॉ. शिंदे यांनी सांगितले की, स्त्रियांनी आपल्यात असणारी नकारात्मकता संपवून टाकणे आवश्यक आहे. स्त्री बलीकरणासाठी शिक्षण आवश्यक आहे. तरूणांनी व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. संजय खोडके, अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे, सूत्रसंचलन प्रा.डॉ. राम पेटारे, आभार प्रा.सी. एन. घरटे यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा. के. डी. कदम, प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ, प्रा. डॉ. बी. सी. मोरे, प्रा.डॉ. वाय.एस. मोरे, प्रा. डॉ.पी.पी. तलवारे, प्रा.एस.के.काकड, प्रा.व्ही.जी.उगलमुगले, प्रा.डॉ. एन.बी.सोनवणे, प्रा.वाय.एम. नांद्रे, प्रा.एस.एन.तोरवणे यांसह विद्यार्थी उपस्थित होते.



Pimpalner Education Society's
KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND
KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,
PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

**7. Constitution Day**
**: 26 November 2019**

कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने **संविधान दिन** साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी संविधानाची प्रास्ताविकेचे समुहवाचन करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे म्हणाले की, घटनेमध्ये डॉ. बाबासाहेबांनी अतिशय सुक्ष्म बाबींचा देखील उल्लेख केला आहे. घटक राज्ये, केंद्रशासित प्रदेश व केंद्रासाठी वेगळे कायदे, अधिकार आहेत. घटना लवचिक असावी ह्याचा देखील उल्लेख त्यात आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मुल्यांवर आधारीत जगातील सर्वात मोठे असलेले हे संविधान केवळ एक ग्रंथ नसुन भारतीयांचे जीवन जगण्याचे मार्गदर्शक तत्वज्ञान त्यात आहे असेही ते म्हणाले.

विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी सुत्रसंचलन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. राम पेटारे प्रयत्नशील होते. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# Constitution Day : 26 November 2019









## दै. सकाळ ३० नोव्हेंबर २०१९

# पाटील महाविद्यालयात संविधान दिन

**पिंपळनेर :** येथील कर्मवीर आ. मा. पाटील महाविद्यालयात संविधान दिनाचा कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन झाले. प्राचार्य डॉ. सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. संजय खोडके यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. राम पेटारे यांनी संयोजन केले.

## दै. लोकमत २८ नोव्हेंबर २०१९

### पिंपळनेर महाविद्यालय

पिंपळनेर- येथील कर्म. आ.मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे होते. प्रारंभी डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी संविधानाची प्रास्ताविकेचे समूहवाचन करण्यात आले. प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. संजय

## 8. Cillege Area Development Project : 7 December 2019

क. ब. चौ. उ. म. वि., यांच्या सिलेज एरिया डेव्हलपमेंट प्रकल्प अंतर्गत बारीपाडा येथे प्रकल्पांची पाहणी करण्यासाठी आयसीटी मुंबई येथील पीएचडीचे २५ संशोधक, कॅंडपी चे १६ सदस्य, आयसीटीचे ०९ शास्त्रज्ञ असे एकूण ५० संशोधकांचा तीन दिवसीय विज्ञान व तंत्रज्ञानातून समृध्दी या विषयावर आधारीत अभ्यास दौरा दि. ०७/१२/२०१९ रोजी आयोजित करण्यात आला होता. त्याची जबाबदारी महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाकडे सोपविण्यात आली होती. याप्रसंगी आयसीटी, मुंबईचे माजी कुलगुरू डॉ. जे. बी. जोशी, श्री. चैत्राम पवार (बारीपाडा), प्रमुख अतिथी डॉ. अजित पाटणकर (सल्लागार, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान, मुंबई), प्रोफेसर एस. व्ही. पानसे (माजी संचालक, बीसीयुडी, मुंबई विद्यापीठ), प्रोफेसर एस. टी. बेंद्रे (जळगाव), प्रोफे. सी. एस. मठपती (मुंबई), प्रोफेसर सौ. रत्नमाला बेंद्रे (व्य. प. सदस्य), डॉ. विवेकानंद शिंदे, श्री. अनिल केळकर (पुणे), श्री. देवधर (मुंबई), सौ.कृतुजा जोशी (मुंबई), सौ. पानसे (मुंबई) हे उपस्थित होते. याप्रसंगी कुलगुरू डॉ. जे. बी. जोशी, प्रोफेसर एस. टी. बेंद्रे, श्री. चैत्राम पवार, प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सध्याच्या विकासातून पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. म्हणून तरुण संशोधकांनी शाश्वत विकासासाठी संशोधन करा असे प्रतिपादन आयसीटी, मुंबईचे माजी कुलगुरू डॉ. जे. बी. जोशी यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना विद्यापीठाने हा उपक्रम राबविण्यासाठी आम्हांला जी संधी उपलब्ध करुन दिली त्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. आयसीटीचे पीएचडी संशोधक कु. प्राची व राहुल परमाने यांनी मनोगत व्यक्त केले. श्री. चैत्राम पवार म्हणाले की, ग्रामीण भागात जल, जंगल जमिन, जन व जनावरे हीच आमची संपदा आहे. यांची वाढ हाच आमचा विकास आहे, असे ही ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले तर आभार प्रा. डॉ. राम पेटारे यांनी मानलेत. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्नशील होते.

# Cillege Area Development Project : 07/12/2019

# सिलेज एरिया डेव्हलपमेंट प्रकल्प दि. ०७/१२/२०१९







# Cillege Area Development Project : 07/12/2019







# Cillege Area Development Project : 07/12/2019









# Cillege Area Development Project : 07/12/2019









# Cillege Area Development Project : 07/12/2019
Cillege Area Development Project : 07/12/2019






Cillege Area Development Project : 07/12/2019

## दै. पुण्य नगरी ०८ डिसेंबर २०१९

# शाश्वत विकासासाठी नव संशोधनाची गरज !

## माजी कुलगुरु डॉ.जे.बी.जोशी यांचे प्रतिपादन



पिंपळनेर : सध्याच्या विकासातून पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. म्हणून शाश्वत विकासासाठी संशोधनाची गरज असून तरुण संशोधकांनी संशोधन करावे, असे प्रतिपादन आयसीटी मुंबईचे माजी कुलगुरु डॉ.जे.बी.जोशी यांनी केले.

सिलेज एरिया डेव्हलपमेंट प्रकल्प अंतर्गत बारीपाडा (ता.साक्री) येथील प्रकल्पांची पाहणी डॉ.जे.बी.जोशी यांनी केली. यावेळी चैत्राम पवार (बारीपाडा), डॉ. अजित पाटणकर (सल्लागार, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान, मुंबई), प्रा. एस.व्ही.पानसे (माजी संचालक, बीसीयुडी, मुंबई विद्यापीठ), प्रा. एस. टी. बेंद्रे (संचालक, कॅडपी, कवचौ उमवि, जळगाव), प्रा. सी.एस.मठपती (मुंबई), प्रा. रंतमाला बेंद्रे (सदस्य, व्यवस्थापन परिषद कबचौ उमवि, जळगाव), डॉ. विवेकानंद शिंदे (संचालक पिं.ए.सो.पिंपळनेर), प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे (पिंपळनेर महाविद्यालय), अनिल केळकर (पुणे), देवघर (मुंबई), ऋतुजा जोशी (मुंबई), पानसे (मुंबई) उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत आयसीटी मुंबई येथील पीएचडीचे २५ संशोधक, कॅडपीचे १६ सदस्य, आयसीटीचे ०९ शास्त्रज्ञ अशा एकूण ५० संशोधकांचा तीन दिवसीय विज्ञान व तंत्रज्ञानातून समृध्दी या विषयावर आधारीत अभ्यास दौरा आहे. डॉ.जोशी म्हणाले, या दौऱ्यात आढळलेल्या समस्यांचा अभ्यास करुन या समस्या सोडविण्यासाठी संशोधन केले जाईल. प्रा.एस.टी.बेंद्रे यांनी कॅडपीची कार्यपध्दती याविषयी माहिती सांगितली. प्राचार्य डॉ.एस. टी.सोनवणे यांनी विद्यापीठाने हा उपक्रम राबविण्यासाठी जी संधी उपलब्ध करुन दिली. याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. आयसीटीचे पीएचडी संशोधक प्राची व राहुल परमाने यांनी मनोगत व्यक्त केले. चैत्राम पवार म्हणाले, ग्रामीण भागात जल, जंगल, जमीन, जन व जनावरे हीच आमची संपदा आहे. यांची वाढ हाच आमचा विकास आहे. याला जोडून सौर उर्जेची विविध साधने विकसित करुन त्यांचा उपयोग झाला तर तो शाश्वत विकास राहील, असे सांगितले. आरोग्य जनजागृतीसाठी प्रा.वाय.एम.नांद्रे यांनी योगासने व प्राणायम प्रशिक्षण घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. संजय खोडके यांनी केले. आभार प्रा.डॉ. राम पेटारे यांनी मानले. प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे यांनी परिश्रम घेतले.

## दैनिक भास्कर दि. १० डिसें. १९

# शाश्वत खेती विकास के लिए नए शोधार्थियों की जरूरत : जोशी

**पिंपलनेर** | साक्री के बारीपाड़ा में विज्ञान और तंत्रविज्ञान से समृद्धि खेती कार्यशाला का आयोजन किया गया। 21 वें शतक में दिन ब दिन वातावरण में बदलाव हो रहे है। बदलाव के कारण प्रदूषण में वृद्धि दर्ज कराई गई। युवा शोधा ने शाश्वतत खेती के विकास के लिए संशोधन करना आज की जरूरत बनी गई है। आईसीटी मुंबई विद्यापीठ के पूर्व कुलगुरु डॉ. जे.बी.जोशी ने उपस्थितों को शाश्वत खेती के बारे में जानकारी दी। कार्यशाला में आईसीटी मुंबई के 25 संशोधक, कैडपी सदस्य 16, आईसीटी के 9 संशोधक कुल 50 संशोधकों का तीन दिवसीय विज्ञान तंत्र विज्ञान पर आधारित तथा पर्यावरण की समृद्धि विषय पर अभ्यास का सामपन हुआ। बारीपाड़ा प्रकल्प के प्रमुख चैत्राम पवार के 150 एकड़ जमीन में पेड़ों और औषध वनस्पति का जतन किया है। प्रमुख अतिथि डॉ. अजित पाटनकर, प्रा.एस.वी. पानसे, प्रा.एस. टी.बेंद्रे,प्रा.सी.एस. मथपति, रत्नमाला बेंद्रे, डॉ. विवेकानंद शिंदे, प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, अनिल केलकर, ऋतुजा जोशी आदि उपस्थित थे। संचलन डॉ. संजय खोड़के तथा आभार प्रा.डॉ. राम पेटारे ने किया।

## देशदूत ०९ डिसें.२०१९

# शाश्वत विकासासाठी नव संशोधकांनी संशोधन करावे

## माजी कुलगुरू डॉ.जे.बी. जोशी यांचे प्रतिपादन



### ... तरच विकास

ग्रामीण भागात जल, जंगल जमिन, जन व जनावरे हीच आमची संपदा आहे. यांची वाढ हाच विकास आहे. याला जोडून सौर उर्जेची विविध साधने विकसीत करुन त्यांचा उपयोग झाला तर तो शाश्वत विकास होईल.

**-चैत्राम पवार**

■ **पिंपळनेर । दि.८ । वार्ताहर**

सध्याच्या विकासातून पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. म्हणून तरुण संशोधकांनी शाश्वत विकासासाठी संशोधन करावे असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ.जे.बी. जोशी यांनी केले.

सिलेज एरिया डेव्हलपमेंट प्रकल्प अंतर्गत बारीपाडा येथील प्रकल्पांची पाहणी करतांना ते बोलत होते. याप्रसंगी चैत्राम पवार(बारीपाडा), डॉ.अजित पाटणकर, प्रोफेसर एस.व्ही. पानसे, प्रोफेसर एस.टी. बेंद्रे, प्रो.सी.एस. मठपती, प्रोफेसर सौ. रत्नमाला बेंद्रे, डॉ.विवेकानंद शिंदे, प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे, अनिल केळकर, श्री.देवधर, सौ.कृतुजा जोशी, सौ. पानसे हे उपस्थित होते.

या उपक्रमाअंतर्गत आयसीटी मुंबई येथील पीएचडीचे २५ संशोधक, कॅडपीचे १६ सदस्य, आयसीटीचे ९ शास्त्रज्ञ असे एकूण ५० संशोधकांचा तीन दिवसीय विज्ञान व तंत्रज्ञानातून समृध्दी या विषयावर आधारीत अभ्यास दौरा होता. डॉ.जोशी पुढे म्हणाले की, या दौऱ्यात आढलेल्या समस्यांचा अभ्यास करून त्या समस्या सोडविण्यासाठी संशोधन केले जाईल. प्रोफेसर एस.टी. बेंद्रे यांनी कॅडपीची कार्यपध्दती या विषयी माहिती सांगीतली. प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना विद्यापीठाने हा उपक्रम राबविण्यासाठी जी संधी उपलब्ध करुन दिली त्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. आयसीटीचे पीएचडी संशोधक प्राची व राहुल परमाने यांनी मनोगत व्यंक्त केले.

आरोग्य जनजागृती साठी प्रा.वाय.एम. नांद्रे यांनी योगासने व प्राणायम घेण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ. संजय खोडके यांनी केले तर आभार प्रा.डॉ.राम पेटारे यांनी मानले.

महाराष्ट्र टाइम्स ०९ डिसेंबर २०१९

# शाश्वत विकासासाठी करावे नव संशोधकांनी संशोधन

म. टा. वृत्तसेवा, धुळे

**माजी कुलगुरू डॉ. जे. बी. जोशी यांचे प्रतिपादन**

सध्याच्या विकासातून पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. म्हणून तरुण संशोधकांनी शाश्वत विकासासाठी संशोधन करा, असे प्रतिपादन आयसीटी, मुंबईचे माजी कुलगुरू डॉ. जे. बी. जोशी यांनी केले.

सिलेज एरिया डेव्हलपमेंट प्रकल्प अंतर्गत जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील बारीपाडा येथील प्रकल्पांची पाहणी करीत असताना ते बोलत होते. याप्रसंगी चैत्राम पवार, प्रमुख अतिथी डॉ. अजित पाटणकर, प्रा. एस. व्ही. पानसे, प्रा. एस. टी. बेंद्रे, प्रा. सी. एस. मठपती, प्रा. रत्नमाला बेंद्रे, डॉ. विवेकानंद शिंदे, प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे, अनिल केळकर, कृतुजा जोशी आदी उपस्थित होते. या उपक्रमाअंतर्गत आयसीटी मुंबई येथील पीएचडीचे २५ संशोधक, 'कॅडपी'चे १६ सदस्य, आयसीटीचे ०९ शास्त्रज्ञ असे एकूण ५० संशोधकांचा तीन दिवसीय 'विज्ञान व तंत्रज्ञानातून समृद्धी' या विषयावर आधारित अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता.

या वेळी डॉ. जोशी म्हणाले की, या दौऱ्यात आढळलेल्या समस्यांचा अभ्यास करून त्या समस्या सोडविण्यासाठी संशोधन केले जाईल. प्रा. एस. टी. बेंद्रे यांनी 'कॅडपी'ची कार्यपद्धती याविषयी माहिती सांगितली. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यापीठाने हा उपक्रम राबविण्यासाठी आम्हाला जी संधी उपलब्ध करून दिली त्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. पीएचडी संशोधक प्राची व राहुल परमाने यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रामीण भागात जल, जंगल जमीन, जन व जनावरे हीच आमची संपदा आहे. यांची वाढ हाच आमचा विकास आहे. याला जोडून सौरऊर्जेची विविध साधने विकसित करून त्यांचा उपयोग झाला तर तो शाश्वत विकास राहील, असे चैत्राम पवार म्हणाले. आरोग्य जनजागृतीसाठी प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी योगासने घेतली. संचलन प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले तर आभार प्रा. डॉ. राम पेटारे यांनी मानले.

## तरुण भारत दि. ०९ डिसेंबर २०१९

# शाश्वत विकासासाठी नव संशोधकांनी संशोधन करा

## माजी कुलगुरू डॉ. जे. बी. जोशी यांचे आवाहन

**पिंपळनेर :** साक्री तालुक्यातील बारीपाडा सध्याच्या विकासातून पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. म्हणून तरुण संशोधकांनी शाश्वत विकासासाठी संशोधन करावे असे आवाहन आयसीटी, मुंबईचे माजी कुलगुरू डॉ. जे. बी. जोशी यांनी केले. सिलेज एरिया डेव्हलपमेंट प्रकल्पअंतर्गत बारीपाडा येथील प्रकल्पांची पाहणी करीत असतांना ते बोलत होते.

याप्रसंगी चैत्राम पवार (बारीपाडा), प्रमुख अतिथी डॉ. अजित पाटणकर (सल्लागार, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान, मुंबई), प्रा. एस. व्ही. पानसे (माजी संचालक, बीसीयुडी, मुंबई विद्यापीठ), प्रा. एस. टी. बेंद्रे ( संचालक, कॅडपी, कबचौ उमवि, जळगाव), प्रा. सी.एस. मठपती (मुंबई), प्रा. रत्नमाला बेंद्रे (सदस्य, व्यवस्थापन परिषद कबचौ उमवि, जळगाव), डॉ. विवेकानंद शिंदे (संचालक पिंपल्स. एज्युकेशन सोसायटी पिंपळनेर), प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे (पिंपळनेर महाविद्यालय), अनिल केळकर (पुणे),



देवधर ( मुंबई), कृतुजा जोशी (मुंबई), पानसे (मुंबई) आदी उपस्थित होते.

**समस्या सोडविण्यासाठी संशोधन करणार**

या उपक्रमाअंतर्गत आयसीटी मुंबई येथील पीएचडीचे २५ संशोधक, कॅडपीचे १६ सदस्य, आयसीटीचे ९ शास्त्रज्ञ अशा एकूण ५० संशोधकांचा विज्ञान व तंत्रज्ञानातून समृध्दी या विषयावर आधारीत तीन दिवसीय अभ्यास दौरा सुरु आहे. डॉ. जोशी म्हणाले की, या दौऱ्यात आढळलेल्या समस्यांचा अभ्यास करून त्या सोडविण्यासाठी संशोधन केले जाईल. प्रा. एस.टी. बेंद्रे यांनी कॅडपीच्या कार्यपध्दतीविषयी माहिती सांगितली. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, आयसीटीचे पीएचडी संशोधक प्राची व राहुल परमाने यांनी मनोगत व्यक्त केले.

चैत्राम पवार म्हणाले की, ग्रामीण भागात जल, जंगल, जमीन, जन व जनावरे हीच आमची संपदा आहे. यांची वाढ हाच आमचा विकास आहे. आरोग्य जनजागृतीसाठी प्रा. वाय. एम. नांद्रे यांनी योगासने व प्राणायम घेतले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. आभार प्रा. डॉ. राम पेटारे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Cillege Area Development Project : 07/12/2019

**दै. स्वतंत्र भारत दि. ०९ डिसेंबर २०१९**

# शाश्वत विकासासाठी अव्याहत संशोधन करावे : डॉ. जे. बी. जोशी



**बारीपाडा। वार्ताहर**

सध्याच्या विकासातून पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. म्हणून तरुण संशोधकांनी शाश्वत विकासासाठी संशोधन करा, असे प्रतिपादन आयसीटी, मुंबईचे माजी कुलगुरू डॉ. जे.बी. जोशी यांनी केले. सिलेज एरिया डेव्हलपमेंट प्रकल्प अंतर्गत बारीपाडा येथील प्रकल्पांची पाहणी करीत असतांना ते बोलत होते. याप्रसंगी चैत्राम पवार (बारीपाडा), प्रमुख अतिथी डॉ. अजित पाटणकर (सल्लागार, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान, मुंबई), प्रोफेसर एस.व्ही. पानसे (माजी संचालक, बीसीयुडी, मुंबई विद्यापीठ), प्रोफेसर एस.टी. बेंद्रे ( संचालक, कॅडपी, कवचौ उमवि, जळगाव), प्रोफे. सी.एस. मठपती (मुंबई), प्रोफेसर रत्नमाला बेंद्रे (सदस्य, व्यवस्थापन परिषद कवचौ उमवि, जळगाव), डॉ.विवेकानंद शिंदे (संचालक पिं.ए.सो.पिंपळनेर), प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे (पिंपळनेर महाविद्यालय), अनिल केळकर (पुणे), देवघर (मुंबई), कृतुजा जोशी (मुंबई), पानसे (मुंबई) हे उपस्थित होते.

या उपक्रमाअंतर्गत आयसीटी मुंबई येथील पीएचडीचे २५ संशोधक, कॅडपी चे १६ सदस्य, आयसीटीचे ९ शास्त्रज्ञ असे एकूण ५० संशोधकांचा तीन दिवसीय विज्ञान व तंत्रज्ञानातून समृध्दी या विषयावर आधारीत अभ्यास दौरा आहे. डॉ. जोशी पुढे म्हणाले की, या दौऱ्यात आढलेल्या समस्यांचा अभ्यास करून त्या समस्या सोडविण्यासाठी संशोधन केले जाईल. प्रोफेसर एस.टी. बेंद्रे यांनी कॅडपीची कार्यपध्दती या विषयी माहीती सांगीतली. प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना विद्यापीठाने हा उपक्रम राबविण्यासाठी आम्हांला जी संधी उपलब्ध करुन दिली त्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. आयसीटीचे पीएचडी संशोधक कु. प्राची व राहुल परमाने यांनी मनोगत व्यक्त केले. श्री. चैत्राम पवार म्हणाले की,. ग्रामीण भागात जल, जंगल जमिन, जन व जनावरे हीच आमची संपदा आहे. यांची वाढ हाच आमचा विकास आहे. याला जोडून सौर उर्जेची विविध साधने विकसीत करुन त्यांचा उपयोग झाला तर तो शाश्वत विकास राहील असे ही ते म्हणाले. स.६.०० वा. आरोग्य जनजागृती साठी प्रा.वाय.एम. नांद्रे यांनी योगासने व प्राणायम घेण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ. संजय खोडके यांनी केले तर आभार प्रा.डॉ. राम पेटारे यांनी मानलेत. प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी परिश्रम घेतले.

## दै. सकाळ ०९ डिसेंबर २०१९

सकाळ

# शाश्वत विकासासाठी संशोधन करा

## डॉ. जोशी : बारीपाडा येथे ५० संशोधकांचा अभ्यास दौरा

**सकाळ वृत्तसेवा**

वार्सा, ता. ८ : सध्याच्या विकासातून पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. म्हणून तरुण संशोधकांनी शाश्वत विकासासाठी संशोधन करावे, असे प्रतिपादन मुंबई येथील 'आयसीटी'चे माजी कुलगुरू डॉ. जे. बी. जोशी यांनी केले.

सिलेज बेस्ड एरिया डेव्हलपमेंट प्रकल्पांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व पिंपळनेर येथील कर्मवीर आ. मा. पाटील महाविद्यालयातर्फे विज्ञान व तंत्रज्ञानातून समृद्धी कार्यशाळा बारीपाडा (ता. साक्री) येथे झाली, तीत डॉ. जोशी बोलत होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चैत्राम पवार, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान संस्थेचे सल्लागार डॉ. अजित पाटणकर, मुंबई विद्यापीठाचे माजी संचालक प्रा. एस. व्ही. पानसे, प्रा. एस. टी. बेंद्रे, प्रा. सी. एस. मठपती, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या प्रा. रत्नमाला बेंद्रे, पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे संचालक डॉ. विवेकानंद शिंदे, आ. मा. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, अनिल केळकर, श्री. देवधर, ऋतुजा जोशी, सौ. पानसे आदी प्रमुख पाहुणे होते.

कार्यशाळेत मुंबई येथील 'आयसीटी'चे 'पीएचडी'चे २५ संशोधक, 'कॅडपी'चे १६ सदस्य, 'आयसीटी'चे नऊ शास्त्रज्ञ अशा ५० संशोधकांचा तीनदिवसीय अभ्यास दौरा झाला. डॉ. जोशी म्हणाले, की या दौऱ्यात आढळलेल्या समस्यांचा अभ्यास करून त्या सोडविण्यासाठी संशोधन केले जाईल. प्रा. बेंद्रे यांनी 'कॅडपी'ची कार्यपद्धती या विषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ. सोनवणे यांनी विद्यापीठाने हा उपक्रम राबविण्यासाठी दिलेल्या संधीबद्दल आभार मानले. पीएचडी संशोधक प्राची व राहुल परमाने यांनी मनोगत व्यक्त केले.

चैत्राम पवार म्हणाले, की ग्रामीण भागात जल, जंगल जमीन, जन व जनावरे, हीच आमची संपदा आहे. यांची वाढ हाच आमचा विकास आहे. याला जोडून सौरऊर्जेची विविध साधने विकसित करून त्यांचा उपयोग झाला तर तो शाश्वत विकास राहील. प्रा. डॉ. संजय खोडके यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. राम पेटारे यांनी आभार मानले. महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी संयोजन केले.



बारीपाडा (ता. साक्री) : विज्ञान-तंत्रज्ञानातून समृद्धी कार्यशाळेस उपस्थित डॉ. जे. बी. जोशी, चैत्राम पवार, डॉ. अजित पाटणकर, प्रा. एस. व्ही. पानसे, प्रा. एस. टी. बेंद्रे, प्रा. सी. एस. मठपती, डॉ. विवेकानंद शिंदे, प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, अनिल केळकर आदी. (छायाचित्र : भिलाजी जिरे)

Jalgaon, Dhule-Today
09/12/2019 Page No. 3

## 9. A Brief Report of Skill Development Workshop on

## Karate Training For Girl Student

**युवती सभेअंतर्गत स्वयंसिध्दा अभियान कार्यशाळा (दि. २४ जाने. ते ३१ जाने. २०२०)**

या कार्यशाळेत महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील ५० विद्यार्थ्यानींना कराटे प्रशिक्षण देण्यात आले. तरुणींनी विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तीपासून सावध रहा. कुठल्याही प्रलोभनांना बळी पडू नका असे प्रतिपादन पिंपळनेर पोलिस स्टेशनचे पी.आय. श्री दिलीप खेडकर यांनी केले. ते कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवती सभेअंतर्गत स्वयंसिद्धा अभियान कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, मार्शल आर्ट चे प्रशिक्षक प्राचार्या श्रीमती सोनाली पाटील, प्रा. किरण पाटील हे उपस्थित होते. श्री खेडकर पुढे म्हणाले की समोरच्या व्यक्तीची विकृती लक्षात आली तर तात्काळ त्याला विरोध करा. अन्याय सहन करू नका. त्यासाठी पोलिस स्टेशनला तक्रार करा. पोलिसांचा हेल्प नंबर १०६४ ला तात्काळ फोन करा. पोलीस प्रशासन सदैव तुमच्या पाठीशी आहे. असा विश्वास त्यांनी तरुणींना दिला.

श्रीमती सोनाली पाटील यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थिनींनी स्वतःच्या संरक्षणासाठी सज्ज झाले पाहिजे असे आव्हान केले. श्री किरण पाटील यांनी मार्शल आर्टचे प्रशिक्षण घेण्यासाठी मनापासून सहभागी व्हा असे सांगितले. प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून, अभ्यासक्रमा व्यतीरिक्त विद्यार्थांच्या सर्वागीण विकासासाठी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयी ऊहापोह केला. हे उपक्रम राबविण्यासाठी प्राध्यापकांचे नियोजन व विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद या विषयी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ संजय खोडके यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी या स्वयंसिद्धा अभियान अंतर्गत आठ दिवस चालणाऱ्या मार्शल आर्ट प्रशिक्षणाबाबत माहिती सांगितली. आभार प्रदर्शन प्रा. के. आर. राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. राम पेटारे, प्रा. पी. एम. सावळे, प्रा. सी. एन. घरटे, प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ, प्रा. डॉ. बी. सी. मोरे, प्रा. के. डी. कदम, प्रा. डॉ. एन. बी. सोनवणे हे प्रयत्नशील होते.

# युवती सभेअंतर्गत स्वयंसिध्दा अभियान
# कार्यशाळा आयोजन दि. २४ जाने. ते ३१ जाने. २०२०

## Skill Development Workshop on
## Karate Training For Girl Student

## Contact Details of Resource Persons

| Sr. No. | Trainer | Mobile |
|---|---|---|
| 01 | Mr. Kiran Anandrao Patil | 9665602110 |
| 02 | Mrs. Sonali Dilliprao Patil | 9130459476 |
| 03 | Mr. Sambhaji Shivaji Ahirrao | 9011302977 |

# Workshop on Karate Training: 24-31 Jan. 2020









## Workshop on Karate Training: 24-31 Jan. 2020












# Workshop on Karate Training: 24-31 Jan. 2020








# Workshop on Karate Training: 24-31 Jan. 2020









# Workshop on Karate Training: 24-31 Jan. 2020









## देशदूत दि. २६ जानेवारी २०२०

देशदूत २६।१।२०२०

# तरुणींनी विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तींपासून सावध राहावे - पी.आय. खेडकर

■ पिंपळनेर । दि.२५ । वार्ताहर

तरुणींनी विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तीपासून सावध रहा. कुठल्याही प्रलोभनांना बळी पडू नका असे आवाहन पिंपळनेर पोलिस स्टेशनचे पीआय दिलीप खेडकर यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवती सभेअंतर्गत स्वयंसिद्धा अभियान कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे हे होते. तर मार्शल आर्टचे प्रशिक्षक प्राचार्या श्रीमती सोनाली पाटील, प्रा. किरण पाटील आदी उपस्थित होते.

श्री खेडकर पुढे म्हणाले की, समोरच्या व्यक्तीची विकृती लक्षात आली तर तात्काळ त्याला विरोध करा. अन्याय सहन करू नका. त्यासाठी पोलिस स्टेशनला तक्रार द्या. पोलिसांना हेल्प नंबर १०६४ ला तात्काळ फोन करा. पोलीस प्रशासन सदैव तुमच्या पाठीशी आहे. असेही त्यांनी सांगितले.

श्रीमती सोनाली पाटील यांनी विद्यार्थिनींनी स्वत:च्या संरक्षणासाठी सज्ज झाले पाहिजे असे आवाहन केले. श्री किरण पाटील यांनी मार्शल आर्टचे प्रशिक्षण घेण्यासाठी मनापासून सहभागी व्हा असे सांगितले. प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून, अभ्यासक्रमाव्यतीरिक्त विद्यार्थांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयी ऊहापोह केला. हे उपक्रम राबविण्यासाठी प्राध्यापकांचे नियोजन व विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद या विषयी




समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी या स्वयंसिद्धा अभियान अंतर्गत आठ दिवस चालणाऱ्या मार्शल आर्ट प्रशिक्षणाबाबत माहिती सांगितली. आभार प्रदर्शन प्रा. के.आर. राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा डॉ. राम पेटारे, प्रा.पी.एम. सावळे, प्रा.सी.एन. घरटे, प्रा.डॉ. डब्ल्यू.बी. शिरसाठ, प्रा.डॉ.बी.सी. मोरे, प्रा.के.डी.कदम, प्रा.डॉ.एन.बी. सोनवणे हे प्रयत्नशील होते. या कार्यक्रमाला विद्यार्थी उपस्थित होते.

## सकाळ दि. ०१ फेब्रुवारी २०२०

सकाळ

# विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तींपासून सावध राहा

## खेडकर : पाटील महाविद्यालयात स्वयंसिद्धा अभियान कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

पिंपळनेर, ता. १ : युवतींनी विकृत प्रवृत्तींच्या व्यक्तींपासून सावध राहावे. कुठल्याही प्रलोभनांना बळी न पडता स्वसंरक्षणासाठी सिद्ध राहावे, असे आवाहन येथील सहाय्यक पोलिस निरीक्षक दिलीप खेडकर यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे येथील कर्मवीर आ. मा. पाटील महाविद्यालयात युवती सभेअंतर्गत स्वयंसिद्धा अभियान कार्यशाळा झाली, तिच्या उद्घाटनप्रसंगी श्री. खेडकर बोलत होते. संस्थेचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे अध्यक्षस्थानी होते. मार्शल आर्टच्या प्रशिक्षक प्राचार्या सोनाली पाटील, प्रा. किरण पाटील उपस्थित होते.

श्री. खेडकर म्हणाले, की समोरच्या व्यक्तीची विकृती लक्षात आली तर तत्काळ त्याला विरोध करा. अन्याय सहन करू नका. त्यासाठी पोलिसांना १०६४ या हेल्पलाइन क्रमांकावर तत्काळ फोन करा. पोलिस प्रशासन सदैव तुमच्या पाठीशी आहे. प्राचार्या पाटील यांनी विद्यार्थिनींनी स्वसंरक्षणासाठी नेहमी सज्ज असावे, असे आवाहन केले. प्रा. किरण पाटील यांनी मार्शल आर्टचे प्रशिक्षण घेण्यासाठी मनापासून सहभागी व्हा, असे सांगितले. प्राचार्य डॉ. सोनवणे यांनी, अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.



पिंपळनेर : आ. मा. पाटील महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागातर्फे युवतींना स्वसंरक्षणाचे धडे देताना मार्शल आर्टचे प्रशिक्षक. (छायाचित्र : अंबादास बेनुसकर)

प्रा. डॉ. संजय खोडके यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. के. आर. राऊत यांनी आभार मानले. प्रा. डॉ. राम पेटारे, प्रा. पी. एम. सावळे, प्रा. सी. एन. घरटे, प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाट, प्रा. डॉ. बी. सी. मोरे, प्रा. के. डी. कदम, प्रा. डॉ. एन. बी. सोनवणे आदींनी संयोजन केले.

Jalgaon, Dhule-Today
02/02/2020 Page No. 3

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010
Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

# 10. Workshop on Gender Equality: 11/2/2020

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या विद्यार्थी विकास विभाग व कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन. के. पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत एकदिवसीय **लिंग समभाव कार्यशाळा** आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजे संभाजी मिलिटरी स्कूलचे क्रीडा संचालक प्रा. किरण पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे होते.

या कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना प्रा. किरण पाटील म्हणाले की, मुलींना / स्त्रीयांना एखादी कृती करणे, सभेत किंवा चारचौघात बोलणे, त्यांनी स्वतः एखादा निर्णय घेणे अर्थात त्यांना अभिव्यक्त होण्याचे स्वातंत्र्य आहे. यासाठी समाजात स्त्री -पुरुष समानता येणे गरजेचे आहे. जसे मुलगा हा वशांचा दिवा आहे तद्वतच मुलगीही वंशाची पणती आहे किंबहूना ती देखील समाज उजळून टाकू शकते. म्हणून मुलगा आणि मुलगी दोन्ही एक समान आहेत. यासाठी स्त्री भृण हत्या रोखली पाहिजे हे भावी जन्मदाते/ जन्मदात्री म्हणून तुमची जबाबदारी आहे असे आवाहन त्यांनी उपस्थित युवक, युवतींना केले. या कार्यशाळेस महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी/ विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. सोनवणे यांनी महिलांनी इ. स. १८५७ ते आजतागायत विविध क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके यांनी तर सूत्रसंचलन प्रा. डॉ. राम पेटारे यांनी केले. आभार प्रा. के. डी. कदम यांनी मानलेत. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाठ, प्रा. डॉ. बी. सी. मोरे, प्रा. एस. के. काकड, प्रा. के. आर. राऊत, प्रा. पी. एम. सावळे, प्रा. डॉ. एन. बी. सोनवणे, प्रा. वाय. एम. नांद्रे, प्रा. एल. जे. गवळी, प्रा. एस. एन. तोरवणे, प्रा. व्ही. जी. उगलमुगले हे प्रयत्नशील होते.

# Workshop on Gender Equality: 11/2/2020













# 11. COVID Lockdown Duty : Report

**कोरोना संसर्ग रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या आवाहनानुसार आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी दिनांक मार्च ते मे 2020 या कालावधीत धुळे जिल्हयातील नासिक सीमारेषा शेलबारी येथे रात्रीची ग्रस्त घातली. तसेच धुळे जिल्हा साक्री तालुक्यातील बल्हाणे गाव रेड झोन मध्ये 18 दिवसांची रात्रीची ड्युटी केली. पिंपळनेर या ठिकाणी देखील काही स्वयंसेवकांनी रात्रीचे गस्त घालत कोरोना संसर्ग रोखण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.**

As per the call of the Maharashtra Government to prevent Corona infection, the National Service Scheme volunteers of our college spent the night at Shelbari, Nashik border in Dhule District from March to May 2020. Also performed night duty for 18 days in Balhane village Red Zone in Taluka Sakri, District Dhule. At Pimpalner also, some volunteers did an important job of preventing Corona infection by patrolling at night. These volunteers were appreciated as **CORONA Warriors by Superintendent of Police, Dhule (Maharashtra)**



पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे

* सन्मानपत्र *

श्री. दिनेश नारायण घरटे, (NCC), मु. आमोडे, 8459249227

माहे मार्च २०२० पासुन संपुर्ण देशात तसेच राज्यात कोरोना विषाणुचा संसर्ग वाढला होता. धुळे जिल्ह्यातही कोरोना विषाणुचे संसर्गापासुन होणारी जिवीतहानी कमी करण्यासाठी पोलीस प्रशासना तर्फे उपाययोजना करण्यात आल्या. सदर कालावधीमध्ये धुळे जिल्हा पोलीस दलाला मदत करण्याकरीता आपली 'कोरोना वॉरीअर्स' (विशेष पोलीस अधिकारी) म्हणून तात्पुरती नियुक्ती करण्यात आली होती. आपण कोरोना वॉरीअर्स म्हणून आपणास देण्यात आलेले कर्तव्य अतिशय उत्तम रित्या व समाजसेवी भावनेने पार पाडुन धुळे जिल्हा पोलीस दलाला बहुमोल सहकार्य केलेले आहे. आपणा कडुन भविष्यातही अशाच प्रकारे उत्कृष्ट जनसेवा घडत राहो याकरिता प्रोत्साहन म्हणून आपणास धुळे जिल्हा पोलीस दलातर्फे हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण :- धुळे

दिनांक :- २३ /०६/२०२०

चिन्मय पंडीत

पोलीस अधीक्षक, धुळे

# COVID Lockdown Duty : Appreciated as CORONA Warriors

## पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे

### * सन्मानपत्र *

श्री. लुहार विजय रहिते, {NCC}, रा. देगाव, 8999004170

माहे मार्च २०२० पासुन संपुर्ण देशात तसेच राज्यात कोरोना विषाणुचा संसर्ग वाढला होता. धुळे जिल्ह्यातही कोरोना विषाणुचे संसर्गापासुन होणारी जिवीतहानी कमी करण्यासाठी पोलीस प्रशासना तर्फे उपाययोजना करण्यात आल्या. सदर कालावधीमध्ये धुळे जिल्हा पोलीस दलाला मदत करण्याकरीता आपली 'कोरोना वॉरीअर्स' (विशेष पोलीस अधिकारी) म्हणून तात्पुरती नियुक्ती करण्यात आली होती. आपण कोरोना वॉरीअर्स म्हणून आपणास देण्यात आलेले कर्तव्य अतिशय उत्तम रित्या व समाजसेवी भावनेने पार पाडुन धुळे जिल्हा पोलीस दलाला बहुमोल सहकार्य केलेले आहे. आपणा कडुन भविष्यातही अशाच प्रकारे उत्कृष्ट जनसेवा घडत राहो याकरिता प्रोत्साहन म्हणून आपणास धुळे जिल्हा पोलीस दलातर्फे हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण :- धुळे

दिनांक :- 23 /०६/२०२०

चिन्मय पंडीत
पोलीस अधीक्षक, धुळे

---

## पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे

### * सन्मानपत्र *

श्री. प्रशांत गोरख धारे (NCC), रा. सभिडे, 9623907118

माहे मार्च २०२० पासुन संपुर्ण देशात तसेच राज्यात कोरोना विषाणुचा संसर्ग वाढला होता. धुळे जिल्ह्यातही कोरोना विषाणुचे संसर्गापासुन होणारी जिवीतहानी कमी करण्यासाठी पोलीस प्रशासना तर्फे उपाययोजना करण्यात आल्या. सदर कालावधीमध्ये धुळे जिल्हा पोलीस दलाला मदत करण्याकरीता आपली 'कोरोना वॉरीअर्स' (विशेष पोलीस अधिकारी) म्हणून तात्पुरती नियुक्ती करण्यात आली होती. आपण कोरोना वॉरीअर्स म्हणून आपणास देण्यात आलेले कर्तव्य अतिशय उत्तम रित्या व समाजसेवी भावनेने पार पाडुन धुळे जिल्हा पोलीस दलाला बहुमोल सहकार्य केलेले आहे. आपणा कडुन भविष्यातही अशाच प्रकारे उत्कृष्ट जनसेवा घडत राहो याकरिता प्रोत्साहन म्हणून आपणास धुळे जिल्हा पोलीस दलातर्फे हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण :- धुळे

दिनांक :- 23 /०६/२०२०

चिन्मय पंडीत
पोलीस अधीक्षक, धुळे